आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० मार्च २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरातल्या २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत केरोसीनचं वितरण करायला केंद्र सरकारची परवानगी
- तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात
- बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा विधानपरिषद सदस्यपदाचा राजीनामा
- येत्या १ एप्रिलपासून देशभरात जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात

**आणि**

- नेपाळचे माजी प्रधानमंत्री के.पी. शर्मा ओली यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी

**<><><><><>**

देशभरातल्या २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत उच्च दर्जाच्या केरोसीनचं वितरण करण्याची परवानगी सरकारने दिली आहे. युद्धपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन तुटवड्यावर काही प्रमाणात तोडगा काढण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं सरकारने राजपत्राद्वारे काढलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. हे केरोसीन फक्त घरगुती इंधन आणि दिवाबत्तीच्या वापरासाठी असून ज्या राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सर्वसाधारणपणे केरोसीन उपलब्ध नव्हतं तिथेही ते आता उपलब्ध केलं जात आहे. या अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात सरकारी तेल कंपन्यांच्या दोन वितरण केंद्रांवर मिळून ५ हजार लिटर केरोसीन उपलब्ध करून  दिलं जाणार आहे. त्वरित वितरण व्हावं यासाठी वितरकांना काही परवान्यामधून सूट दिली जाईल. हा शासननिर्णय त्वरित प्रभावाने अमलात येणार असून पुढील दोन महिन्यांसाठी तो लागू राहील.

**<><><><><>**

भारताचा ध्वज असलेल्या आणखी दोन LPG वाहक जहाजांनी ***होर्मुझ*** ची सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली आहे. या जहाजांमध्ये सुमारे ९४ हजार टन LPG आहे. 'BW TYR' आणि 'BW ELM' ही दोन LPG वाहक जहाजं येत्या दोन दिवसांत भारताच्या किनाऱ्यावर पोहोचतील, असा अंदाज आहे. 'BW TYR' हे जहाज उद्या मुंबईत तर 'BW ELM' हे जहाज येत्या १ एप्रिलला 'न्यू मंगलोर' मध्ये पोहोचेल असा अंदाज आहे. दरम्यान शत्रु राष्ट्र नसलेल्या राष्ट्रांची जहाजं इराणच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून या जलमार्गावरून प्रवास करू शकतील, असं इराणनं गेल्या आठवड्यात स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

कुवेतमध्ये काल संध्याकाळी इराणने केलेल्या हल्ल्यात वीज उत्पादन आणि जलशुद्धीकरण केंद्राचं मोठं नुकसान झालं असून एका भारतीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. कुवेतच्या वीज, जल आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या प्रवक्त्यानी ही माहिती दिली आहे. तंत्रज्ञांची पथकं घटनास्थळी पोचली असून दुरुस्ती आणि पुनर्बांधणीची कामं सुरू झाली आहेत. वीज आणि पाणीपुरवठा लवकरात लवकर सुरु करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु असल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे.

कुवेतमधल्या भारतीय दूतावासाने या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून वीज आणि पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी कुवेत सरकारला मदत करण्याची तयारी दाखवली आहे.

**<><><><><>**

तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने अधिसूचना जारी केली असून आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तामिळनाडू विधानसभेच्या सर्व म्हणजेच २३४ मतदारसंघांसाठी एकाच टप्प्यात मतदान

होईल, तर पश्चिम बंगालमधल्या १५२ मतदारसंघांसाठी पहिल्या टप्प्यात २३ एप्रिलला मतदान होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ६ एप्रिल असून ९ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

दरम्यान निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालची चौथी मतदार यादी काल रात्री प्रसिद्ध केली. आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, कालच्या यादीमध्ये सुमारे २ लाख नवीन मतदारांच्या नावांचा समावेश असून या चारही याद्या मिळून आतापर्यंत जवळपास ३५ लाख नावे प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

राज्यसभेवर निवडून आल्यानंतर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज बिहार विधान परिषदेच्या सदस्यपदाचा राजीनामा दिला. जदयू चे आमदार संजय गांधी यांनी नितीश कुमार यांचा राजीनामा विधानपरिषदेचे सभापती अवधेश नारायण सिंह यांच्याकडे सादर केला. राज्यसभेचे सदस्य म्हणून निवडून आल्यामुळे नितीशकुमार यांनी विधानपरिषदेच्या सदस्यपदाचा राजीनामा दिल्याचं मंत्री विजय कुमार चौधरी यांनी सांगितलं. नितीश कुमार लवकरच मुख्यमंत्रीपदाचाही राजीनामा देतील असं सांगितलं जात आहे.

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी देखील आपल्या विधानसभा सदस्यपदाचा राजीनामा दिला. भाजपा प्रदेशाध्यक्ष संजय सरोगी यांनी नितीन नबीन यांचा राजीनामा विधानसभेचे अध्यक्ष प्रेमकुमार यांच्याकडे सादर केला. १६ मार्चला झालेल्या राज्यसभा निवडणुकीत नितीन नबीन देखील बिनविरोध निवडून आले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज आसाम आणि पुद्दुचेरीमधल्या भाजप कार्यकर्त्यांशी नमो ॲप च्या माध्यमातून ‘मेरा बूथ सबसे मजबूत’ या उपक्रमांतर्गत संवाद साधणार आहेत. आसामने तसेच पुद्दुचेरीने विविध क्षेत्रांमध्ये गेल्या दशकभरात केलेली प्रगती

सर्वांच्या समोर असून आसाम आणि पुद्दुचेरीची जनता येत्या पाच वर्षांसाठी पुन्हा एकदा एनडीए चं  डबल इंजिन सरकार निवडून देईल, असा विश्वास मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात व्यक्त केला आहे.

<><><><><>

येत्या १ एप्रिलपासून देशभरात जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. देशातली ही १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना असणार आहे. देशाचे महानिबंधक आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी आज दिल्लीत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली.

या प्रक्रियेअंतर्गत १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीदरम्यानच्या ३० दिवसांच्या कालावधीत राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांकडून घरांची यादी तयार करण्याचं काम केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

यंदाच्या जनगणना प्रक्रियेअंतर्गत पहिल्यांदाच स्वयं गणनेची सुविधा उपलब्ध करून दिली गेली आहे, याअंतर्गत घरांची यादी करण्याचं काम सुरू होण्यापूर्वीच्या १५ दिवसांच्या कालावधीत नागरिकांना ही सुविधा वापरता येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. स्वयं गणनेसाठीचं पोर्टल १६ भाषांमध्ये उपलब्ध करून दिलं आहे अशी माहितीही त्यांनी दिली.

जनगणनेसाठीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रश्नांची अधिसूचना आधीच जारी केली आहे, तर दुसऱ्या टप्प्यासाठीचे प्रश्न लवकरच प्रसिद्ध केले जातील असं ते म्हणाले. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जातिनिहाय गणना केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आणि मूलभूत संरचना या जागतिक अस्थिरतेच्या काळातही मजबूत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन

यांनी म्हटलं आहे. त्या आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होत्या. जगभरातल्या सर्वच देशांचं चलन या युद्ध परिस्थितीमुळे प्रभावित झालं असून डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण होण्यामागचं कारणदेखील हेच असल्याचं त्यांनी सांगितलं.  देशातली महागाई कमी झाली आहे, जीडीपी ७ टक्क्याहून अधिक दराने वाढत आहे, आणि चालू खात्यातली तूट १ टक्क्याहून कमी आहे, असं त्यांनी सांगितलं. देशाची सर्वांगीण प्रगती होत असताना त्याकडे दुर्लक्ष करून केवळ रुपयातली घसरण अधोरेखित करण्याचं विरोधी पक्षांचं धोरण चुकीचं असल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

बँकेच्या ग्राहकांची माहिती सुरक्षित आणि गुप्त राहावी यासाठी बँका योग्य ती काळजी घेत असून केवळ आवश्यकता असल्यासच ही माहिती अधिकाऱ्यांना दिली जाते असं अर्थमंत्र्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

**<><><><><>**

नेपाळचे माजी प्रधानमंत्री  के.पी. शर्मा ओली यांना काल काठमांडू जिल्हा न्यायालयाने पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. सप्टेंबर २०२५ मध्ये नेपाळमध्ये झालेलं जेन झी चं आंदोलन  दडपण्यात  कथित सहभाग असल्याच्या आरोपावरून, ओली आणि माजी गृहमंत्री रमेश लेखक यांना शनिवारी अटक करण्यात आली. या आंदोलनात ७६ लोकांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, एका प्रकरणात मनी लॉँड्रिंग संदर्भात माजी ऊर्जा मंत्री आणि नेपाळी काँग्रेसचे नेते दीपक खड्का यांना नेपाळ पोलिसांनी काल अटक केली.

**<><><><><>**

सुदान मधे बंडखोर निमलष्करी दलांच्या हल्ल्यात  १४ जणांचा मृत्यू झाला आहे. यात पाच बालकं आणि दोन महिलांचा समावेश आहे. आरएसएफ या

निमलष्करी दलाने शनिवारी दिल्लींग इथं हल्ला केला. हा हल्ला सुदानच्या लष्कराने परतवून लावल्याचं सांगितलं जात आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धामुळे तेलटंचाईचा सामना करत असलेल्या श्रीलंकेला भारताने पाठवलेल्या तेलाच्या टँकरसाठी श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसनायके यांनी प्रधानमंत्री मोदी यांचे आभार मानले आहेत.

**<><><><><>**

भारताची शीतलदेवीला २०२५ या वर्षाचा ‘पॅराआर्चर ऑफ द ईयर’ हा पुरस्कार जाहीर झाला आहे. दोन्ही हात नसल्यामुळे पायाने तिरंदाजी करणाऱ्या जम्मू काश्मीरच्या शीतलदेवीने गेल्यावर्षीच्या ग्वांगजू इथल्या पॅरातिरंदाजी चषक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं होतं.

**//<><><><><>//**